# पलूस सहकारी बँक लि; पलूस

प्रधान कार्यालय ः ५५५अ,मेन रोड,पलूस ता. पलूस जि. सांगली – ४१६३१०

## 1. SOP(Standard Operating Procedure) for Termination of License

- ग्राहकांनी या करारापत्रातील कोणत्याही अटीचा भंग केल्यास किंवा चुक केल्यास आणि / किंवा बॅकेस असे वाटले की ग्राहक कराराच्या अटी व शर्तीचे पालन करत नाही अथवा सहकार्य करत नाही अशा परिस्थितीमध्ये बॅक ग्राहकास किमान तीन महिन्यांआधी लेखी नोटीस ( टर्मिनेशन नोटीस ) जारी करून सदर लॉकर वापराचा परवाना रद्द करू शकते
- सदर नोटीस रजिस्टर पोस्ट किंवा स्पीड पोस्ट व्दारे (आणि ग्राहकाचा ईमेल आयडी उपलब्ध असलेस १) ई मेलव्दारे आणि २) जेथे ग्राहकाचा मोबाईल फोन नंबर उपलब्ध आहे तिथे SMS व्दारे वा व्हॉटसअॅपव्दारे) ग्राहकाला किमान तीन महिन्यांआधी लेखी नोटीस ( टर्मिनेशन नोटीस ) जारी करून सदर लॉकर वापराचा परवाना रद्द करू शकते.
- लेखी नोटीस ( टर्मिनेशन नोटीस ) मिळाल्यानंतर ग्राहकास ताबोडतोब आणि टर्मिनेशन नोटीस अंतर्ग त निर्धारित नोटीस कालावधी संपण्यापूर्वी लॉकर रिकामा करावा लागेल आणि बॅकेंने प्रदान केलेल्या चाव्या,पासवर्ड किंवा इतर कोणतीही ओळख यंत्रणा आणि कागदपत्रे बॅकेस परत करावी लागतील

**2. SOP (Standard Operating Procedure) for Breaking open of the Locker and dealing with its contents**

**a)** बँकेला करारातील तरतुदी बँकेच्या अंतर्गत धोरणे आणि कार्यपदधती आणि प्रचलित लागु कायदे आणि नियमास अधिन राहून खालीलपैकी कोणतीही एक किंवा अधिक घटनेनंतर लॉकर तोडणेचा अधिकार राहील.

- ग्राहकांनी या करारापत्रातील कोणत्याही अटीचा भंग केल्यास किंवा चुक केल्यास आणि / किंवा बँकेस असे वाटले की ग्राहक कराराच्या अटी व शर्तींचे पालन करत नाही अथवा सहकार्य करत नाही अशा परिस्थितीमध्ये ग्राहकाला नोटीस दिलेनंतर नोटीस कालवधीच्या समाप्तीपूर्वी ग्राहक सदर लॉकर बँकेस रिकामा करून देत नसलेस
- सलग ३ ( तीन ) वर्षे भाडे अदा केले नसलेस
- ७ ( सात ) वर्षे किंवा त्याहुन अधिक कालावधीसाठी लॉकरचा वापर केला नसलेस ( भाडे दिले असले तरी ) किंवा ग्राहकाशी बँकेचा संपर्क होत नसलेस

**b)** लॉकर उघडणेचा/तोडणेचा अधिकार वापरण्यापुर्वी बँकेस ग्राहकाला किमान तीन महिने आधी लेखी नोटीस (वरील कलम ३.२.१ अंतर्गत समाप्तीच्या सूचनेव्यतिरिक्त ) रजिस्टर पोस्टाने आणि ग्राहकाचा ईमेल आयडी उपलब्ध असलेल्या १) ई मेलव्दारे आणि २) ग्राहकाचा मोबाईल फोन नंबर उपलब्ध आहे तिथे SMS व्दारे आणि व्हॉटसअॅपव्दारे) देणेत येईल. ("ब्रेक ओपन नोटीस")

**c)** या करारांतर्गत कोणत्याही अटीचे उल्लंघन झाले असले तरी लॉकर तोडण्यापूर्वी बँक ग्राहकाच्या मोबाईल फोनवर संदेश पाठवुन ग्राहकाच्या पत्यावर वैयक्तिक संदेशवाहक पाठवुन ग्राहकांच्या लॅंड लाईन, मोबाईल फोनवर फोन कॉल करून ग्राहकाशी संपर्क साधण्यासाठी सर्व शक्य प्रयत्न करणेत येईल.

**d)** बँकेने पाठवलेल्या लॉकर रद्द करणेची नोटीस (Termination Notice)आणि लॉकर तोडणेची (Locker Break Open Notice)नोटीस वितरित न झाल्यास किंवा बँकेने पॅरा नं **b** व **c** अंतर्गत नमूद केलेल्या गोष्टींसह वाजवी प्रयत्न करूनही ग्राहकाशी संपर्क न झालेस बँक लॉकर

तोडण्याआधी याबावत कमीत कमी ३ महिनेआधी ग्राहक ज्या ठिकाणी राहतो त्या अथवा ग्राहकाने तदनंतर कळविलेल्या पत्त्याच्या ठिकाणी किमान २ वृत्तपत्रात (एक इंग्रजीत आणि दुसरी मराठीमध्ये) जाहीर नोटीस दिली जाईल.

**e)** लॉकर फोडण्याचे काम बॅंकेचे दोन अधिकारी आणि साक्षीदार म्हणुन काम करणा–या दोन स्वतंत्र व्यक्ती अशा समितीच्या उपस्थितीत केले जाईल.

**f)** वर नमुद केलेल्या प्रकियेचे पालन करून लॉकर उघडल्यानंतर बॅंकेने लॉकरमधील सामग्रीची तपशीलवार यादी तयार करावी आणि बॅंकेच्या अधिकृत मुल्यांकन करणा–या व्यक्तिव्दारे लॉकरमधील सामुग्रीचे मूल्यांकन करणेत येईल आणि लॉकरची सामग्री छेडछाड प्रतिबंधित असणा–या अग्निरोधक तिजोरीत तपशीलवार यादीसह सीलबंद लिफाफ्यात ठेवणेत येईल.

**g)** वरिल व्यतिरिक्त बॅंक इन्व्हेंटरी असेसमेंटसह ब्रेक ओपन प्रकियेचा व्हिडिओ देखील रेकॉर्ड करणेत येईल आणि भविष्यात कोणत्याही विवादाच्या किंवा न्यायालयीन खटल्याच्या बावतीत पुरावे प्रदान करण्यासाठी ते सुरक्षित आणि जतन करणत येईल.

**h)** याशिवाय, लॉकर उघडण्याचे तपशील लॉकर रजिस्टर तसेच बॅंकेच्या कोअर बॅंकिंग सिस्टीममध्ये (CBS ) अथवा इतर सायबर सिक्युरिटी धोरणाचे पालन करणा–या संगणक प्रणालीमध्ये नोंद वा जतन करणत येईल.

**i)** वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे तयार केलेल्या यादीमध्ये नोंदवलेल्या लॉकरच्या वस्तूंची विल्हेवाट, सार्वजनिक लिलावात विकीदवारे केली जाईल आणि विकीच्या रक्कमेमधून प्रथम ग्राहकाकडून बॅंकेस देय असणारी रक्कम ( थकबाकी भाडे, लॉकर तोडणेचा खर्च आणि इतर कोणत्याही देय रकमेसह ) वसूल करून शिल्लक रक्कम ग्राहकाला परत केली जाईल किंवा ग्राहकाच्या आदेशानुसार विल्हेवाटीसाठी ठेवली जाईल.

**j)** सार्वजनिक लिलाव करून लॉकरमधील सामग्रीची विकी करण्यापूवी बॅंकेस ग्राहकाला किमान तीन महिने आधी रजिस्टर पोस्टाने लेखी नोटीस पाठविणेत येईल तसेच ग्राहकाचा ईमेल आयडी उपलब्ध असल्यास १) ई मेलव्दारे आणि २) SMS व्दारे आणि जेथे ग्राहकाचा मोबाईल फोन नंबर उपलब्ध आहे तिथे व्हॉटसॲपव्दारे) देणेत येईल . (“ लिलाव सूचना” ) या नोटीशीमध्ये लिलावाची तारीख , वेळ, ठिकाण आणि लॉकरच्या सामग्रीच्या यादीचा समावेश असेल.